## महत्त्वाचे



बर्टोन-ऑन-ट्रेंट : स्कॉटलँडविरुद्ध होणाऱ्या 'फ' गटातील वर्ल्डकप क्वालिफाइंग फुटबॉल सामन्याच्या पार्श्वभूमीवर इंग्लंडचा स्ट्रायकर वायने रुनी आणि जेमी वर्डी सराव करताना.

### मिशेल स्टार्क होबार्ट कसोटीमध्ये खेळणार

होबार्ट: ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्क दुखापतीच्या गंभीर समस्येनंतरदेखील दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १२ नोव्हेंबरपासून सुरु होणाऱ्या दुसऱ्या कसोटीमध्ये खेळणार आहे. ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पहिला कसोटी गमावला आहे. अशामध्ये राष्ट्रीय निवडकर्त्यांनी दुखापतीचा धोका पत्करुन त्याची दुसऱ्या कसोटीसाठी निवड केली आहे. संघाचे फिजिओ डेव्हिड बेकले म्हणाले, स्टार्क दुसऱ्या कसोटीसाठी तयार आहे.

### पाकिस्तान मालिकेतून मार्टिन गुप्टिल बाहेर

वेलिंग्टन: न्यूझीलंडचा अनुभवी सलामीवीर मार्टिन गुप्टिलला पाकिस्तानविरुद्ध या महिन्यात खेळवल्या जाणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी राष्ट्रीय संघातून वगळण्यात आले आहे. त्यानंतर त्याच्या कसोटी कारकिर्दीत धोक्यात आली आहे. न्यूझीलंड क्रिकेट संघटनेने गुरुवारी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी १३ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे.यामध्ये गुप्टिलला स्थान देण्यात आले नाही. भारत दौऱ्यावर तीन सामन्यांच्या मालिकेमध्ये 0-३ ने पराभवाला सामोरे जाणाऱ्या न्यूझीलंड संघाचा सदस्य असलेला अनुभवी फलंदाज गुप्टिलच्या प्रदर्शन या कसोटीत खूपच निराशाजनक राहिले होते.

### माजी अध्यक्षावर बंदीची मागणी

ज्यूरिख: आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाच्या (फिफा) शिस्तपालन समितीने होंडूरासचे माजी अध्यक्ष राफेल कॅलेजसवर वैश्विक संस्थेच्या नियमनांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली आजीवन बंदीची मागणी केली आहे. समितीने सांगितले की, कॅलेजस यांनी घुसघोरी आणि भ्रष्टाचाराच्या नियमनांचे उल्लंघन केले आहे. याव्यतिरिक्त ते चार अन्य प्रकरणातदेखील दोषी आढळून आले आहेत. होंडूरास फुटबॉल संघाच्या माजी अध्यक्षांची अवैधपणे मार्केटिंग कंपनीकडून पैसे घेतल्याप्रकरणी चौकशी सुरु आहे.

### विष्णू बनला एशियन टेनिस टूर चॅम्पियन

कोलकाता: डेव्हिस कप खेळाडू विष्णू वर्धनने आपल्याच देशाचा व्ही.एम. रंजीतचा पराभव करीत पाच हजार यूएस डॉलर बक्षिसाच्या सेंट्रल एक्साईज एशियन टेनिस टूरचा किताब आपल्या नावे केला. टॉप सीडेड विष्णूने येथे सॉल्ट लेकच्या बंगाल टेनिस अकॅडमीमध्ये तामिळनाडूच्या रंजीतचा सलग सेटमध्ये ६-३, ६-४ ने पराभूत केले. या विजयासह विष्णूला ९00 डॉलरचे बक्षीस आणि १२ गुण मिळाले. उपविजेता रंजीतला ६00 डॉलर आणि सात गुण प्राप्त झाले.

## राजकोट कसोटी : पहिल्या डावात पाहुण्यांच्या ५३७ धावा, भारत बिनबाद ६३

# इंग्लंडचा धावडोंगर

**भारतात** मोठी धावसंख्या उभारण्याची इंग्लंडची ही तिसरी वेळ. याआधी १९८५मध्ये चेन्नईत ६५२ आणि १९६४मध्ये कानपूर येथे ५५९ धावा केल्या होत्या.

**विदेशी** संघाच्या ३ फलंदाजांनी एका डावात शतक झळकावण्याची २00९नंतर ही पहिली वेळ ठरली. मोटेरा येथे श्रीलंकेने ही कामगिरी केली होती.

**भारतीय** संघाला सातत्याने झेल सोडण्याचा तसेच खराब क्षेत्ररक्षणाचा फटका बसला. रवींद्र जडेजा सर्वांत यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ३0 षटकांत ८६ धावांत ३ गडी बाद केले. आश्विनने ४६ षटकांत १६७ धावांत २, उमेश यादवने ३१.५ षटकांत ११२ धावांत २ व मो. शमीने २८.१ षटकांत ६५ धावांत २ गडी बाद केले. लेग स्पिनर अमित मिश्राने २३.३ षटकांत ९८ धावांत एकमेव बळी घेतला.

इंग्लंडसाठी ज्यो रुटने १८0 चेंडूंत ११ चौकार व एका षटकारासह १२४, मोईन अली याने २३१ चेंडूंत १३ चौकारांसह ११७ आणि बेन स्टोक्स याने २३५ चेंडूंत १३, चौकार व दोन षटकारांसह १२८ धावा ठोकल्या. जॉनी बेरोस्टॉने ४६ तसेच जफर अन्सारीने ३२ धावांचे योगदान दिले.

**राजकोट :** ज्यो रुट (१२४), मोईन अली (११७) आणि बेन स्टोक्स (१२८) या तिघांच्या दमदार शतकी खेळीच्या बळावर पाहुण्या इंग्लंडने भारतीय गोलंदाजांची हवा गुल करुन गुरुवारी पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात १५९.३ षटकांत तब्बल ५३७ धावांचा डोंगर रचला. यामुळे भारत दडपणाखाली आला आहे. न्यूझीलंडविरुद्ध ३-० ने मालिका जिंकताच तोऱ्यात वावरणाऱ्या भारतीय गोलंदाजांच्या मर्यादा इंग्लिश फलंदाजांनी उघड केल्या.

भारताने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा २३ षटकांत बिनबाद ६३ अशी मजल मारली. भारतीय संघ पाहुण्यांच्या तुलनेत ४७४ धावांनी मागे असून १० गडी शिल्लक आहेत. मुरली विजय ७० चेंडूंत ४ चौकारांसह २५ आणि डावखुरा फलंदाज गौतम गंभीर ६८ चेंडू टोलवून ४ चौकारांसह २८ धावांवर नाबाद आहेत.

इंग्लंडने आज सकाळी कालच्या ४ बाद ३११वरुन पुढे खेळ सुरु केला. मोईन ९९ आणि स्टोक्स १९ धावांवर होते. दोघेही आक्रमक खेळल्याने उपाहारापर्यंत ६ बाद ४५० धावा होत्या. २९ वर्षांच्या मोईनने १९५ चेंडूंत करिअरमधील शतक गाठले.

मोहंमद शमीने त्याला बाद करण्याआधी स्टोक्ससोबत त्याने पाचव्या गड्यासाठी ६२ धावांची भागीदारी केली. २५ वर्षांच्या स्टोक्सनेदेखील चौथे कसोटी शतक पूर्ण केले. जॉनी बेरस्टॉ हा ४४२ धावांवर शमीचा बळी ठरला. स्टोक्सने नवव्या गड्यासाठी जफरसोबत ५२ धावांची भागीदारी केली. जफरला मिश्राने पायचित करताच इंग्लंडचा पहिला डाव ओाटपला. (वृत्तसंस्था)

### सकलेनने संयम शिकविला : मोईन



माईन खान

भारताविरुद्ध पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात शतक ठोकले ते संयमाच्या बळावरच! इंग्लंड संघाचे फिरकी गोलंदाजी सल्लागार सकलेन मुश्ताक यांनी मला हा संयम शिकविल्यामुळे मी मोठी खेळी करु शकलो, असे शतकवीर मोईन अली याचे मत आहे.

मोईनने ११७ धावा केल्या. दिवसाचा खेळ आटोपल्यानंतर मोईन म्हणाला, "येथे चेंडू चांगले वळण घेत होता. काही चेंडू रिव्हर्स स्विंगदेखील होताना दिसायचे. या खेळपट्टीवर फिरकी चेंडू फार लवकरच वळण घेत होते. तरीही संयम राखला. संयम राखण्याचे तंत्र मला सकलेनने शिकविले. खेळताना नेहमी संयम पाळा आणि साहस कायम राखून खेळा, असे सकलेन नेहमी सांगतात. कालच्या फलंदाजीनंतर माझ्या पायात जडपणा आला होता. दुसऱ्या दिवशी फलंदाजीला जाताना अस्वस्थ वाटत होते, थकवा जाणवत होता; पण मी संयम राखून खेळलो."

### अँडरसन दुसऱ्या कसोटीत खेळण्याची आशा

- खांद्याच्या दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याला मुकलेला इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन विशाखापट्टणम्मध्ये १७ नोव्हेंबरपासून सुरु होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळण्याची आशा आहे.
- इंग्लंडतर्फे कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज असलेला अँडरसन खांद्याच्या दुखापतीमुळे गेल्या ऑगस्ट महिन्यापासून संघातून बाहेर आहे; पण भारताविरुद्धच्या मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यात तो पुनरागमन करण्याची शक्यता आहे.
- अँडरसन म्हणाला, "गेल्या काही दिवसांपासून मी कसून सराव करीत असून पुनरागमन करण्यास उत्सुक आहे. मी नेटमध्ये चांगली गोलंदाजी केली असून मला गोलंदाजी करताना कुठली अडचण भासत नाही. दुसऱ्या कसोटी सामन्याद्वारे पुनरागमन करण्याचे माझे लक्ष्य आहे."

### धावफलक

**इंग्लंड पहिला डाव** (कालच्या ४ बाद ३११ वरुन) : ॲलिस्टर कूक पायचित गो. जडेजा २१, हसीब हमीद पायचित गो. आश्विन ३१, ज्यो रुट झे. आणि गो. यादव १२४, बेन डकेट झे. रहाणे गो. आश्विन १३, मोईन अली त्रि. गो. शमी ११७, बेन स्टोक्स झे. साहा गो. यादव १२८, जॉनी बेरेस्टॉ झे. साहा गो. शमी ४६, ख्रिस व्होग्स झे. साहा गो. जडेजा ४, आदील रशीद झे. यादव गो. जडेजा ५, जफर अन्सारी पायचित गो. मिश्रा ३२, स्टुअर्ट ब्रॉड नाबाद ६. अवांतर : १०, एकूण : १५९.३ षटकांत सर्व बाद ५३७ धावा. गडी बाद क्रम : १/४७, २/७६, ३/१०२, ४/२८१, ५/३४३, ६/४४२, ७/४५१, ८/४६५,९/५१७. गोलंदाजी : शमी २८.१-५-६५-२, यादव ३१.५-३-११२-२, आश्विन ४६-३-१६७-२, जडेजा ३0-४-८६-३, मिश्रा २३.३-३-९८-१.

**भारत पहिला डाव :** मुरली विजय खेळत आहे २५, गौतम गंभीर खेळत आहे २८. अवांतर : १०, एकूण : २३ षटकांत बिनबाद ६३ धावा. गोलंदाजी : ब्रॉड ५-१-२0-0, व्होक्स ७-२-१७-0, मोईन ६-२-६-0, अन्सारी ३-0-३-0, रशीद २-0-८-0.



### विकेट घेणे ही सांघिक जबाबदारी: जडेजा

राजकोट : विकेट घेणे ही कोणाएका गोलंदाजाची जबाबदारी नाही, तर ती सांघिक जबाबदारी असल्याचे सांगून रवींद्र जडेजा याने राजकोट कसोटीत पहिल्या डावात कामगिरी करण्यात अपयशी ठरलेल्या रविचंद्रन आश्विनचा बचाव केला.

दुसऱ्या दिवशी जडेजा म्हणाला, "या खेळपट्टीवर पहिल्या दोन दिवसांत फिरकीला अनुकूलता दिसली नाही. आमच्याकडे पाच गोलंदाज असल्याने विकेट घेण्याची जबाबदारी केवळ आश्विनचीच नाही, तर आम्हा पाचही जणांची आहे.

बेन स्टोक्स

## विश्वचषकासाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर भर

### प्रफुल्ल पटेल : फुटबॉलमध्ये शॉर्टकट नको



**नवी दिल्ली :** पुढील वर्षी भारतात होणाऱ्या १७ वर्षे गटाच्या फिफा फुटबॉल विश्वचषकासाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर बारीक लक्ष असल्याचे अ. भा. फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ)अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे.

देशात फुटबॉलच्या विकासासाठी आता आम्ही योग्य दिशेने वाटचाल करीत असल्याचे सांगून खा. पटेल पुढे म्हणाले, की पायाभूत सुविधांच्या उभारणीसोबतच विश्वचषकाच्या तयारीचा वारंवार आढावा घेतला जात आहे. ज्या पायाभूत सुविधा उभारायच्या आहेत, त्या वेळेच्या आत पूर्ण होतील याची खबरदारी म्हणून आम्ही वारंवार बारकाईने लक्ष ठेवून आहोत. व्यापक स्तरावर सुविधा उपलब्ध कशा होतील, यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.

भारताचा माजी कर्णधार बायचुंग भूतिया याने अलीकडे भाष्य करताना देशात फुटबॉलच्या विकासासाठी आवश्यक पायाभूत सुधारणांच्या उभारणीकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त केली होती. यावर पटेल यांचे मत जाणून घेतले असता ते म्हणाले, की एआयएफएफने यंदा आयोजित केलेल्या १६ वर्षांखालील यूथ लीगमध्ये अनेक संघांचा सहभाग होता. अधिकाधिक खेळाडूंचा सहभाग असणे म्हणजे पुढील वर्षीच्या १७ वर्षे गटाच्या विश्वचषकासाठी भारतीय संघाला अनेक पर्याय उपलब्ध असणे, असा आहे. पायाभूत स्तरावर सुधारणांची गरज असल्याचे जेव्हा बोलतो तेव्हा कुठलाही शॉर्टकट नको. शॉर्टकटमुळे देशात फुटबॉलचा विकास होणार नाही. त्यासाठी बाल्यावस्थेपासून टॅलेंट शोधून त्यांच्यावर मेहनत घ्यावी लागेल. १६ वर्षे गटाची लीग हा उत्तम पर्याय आहे. यातून देशासाठी १२-१३ वर्षे खेळणारे प्रतिभावान खेळाडू तयार होऊ शकतील, असा मला विश्वास वाटतो. (वृत्तसंस्था)

## 'प्रशिक्षक नियुक्तीमध्ये सरकारची भूमिका असावी'

### विजयकुमार गोयल : जाहिरात प्रसिद्ध करु

**नवी दिल्ली :** विविध खेळांसाठी विदेशी प्रशिक्षकांची नियुक्ती करताना सरकारची भूमिका महत्त्वाची असायला हवी, असे मत क्रीडामंत्री विजय गोयल यांनी व्यक्त केले. प्रशिक्षकांच्या अंतिम नियुक्तीबाबत कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी संबंधित महासंघासोबत चर्चा करण्यात येईल, असेही गोयल यांनी या वेळी स्पष्ट केले.

क्रीडामंत्री गोयल यांनी नेमबाज गगन नारंग, माजी हॉकीपटू वीरेन रासकिन्हा आणि जगवीर सिंग यांच्यासह साईचे माजी महासंचालक यांच्यासोबत चार तास प्रदीर्घ चर्चा केली. २०२० च्या ऑलिम्पिकवर लक्ष केंद्रित करताना या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

गोयल म्हणाले, ''आगामी ऑलिम्पिकच्या तयारीला आतापासून प्रारंभ व्हायला हवा. त्यासाठी आम्ही या बैठकीचे आयोजन केले होते. त्यात आम्हाला अनेक सूचना मिळाल्या. या बैठकीचा अहवाल तयार करण्यात येईल. त्यात देशात खेळासाठी उपलब्ध आधारभूत सुविधांचाही उल्लेख करण्यात येईल.''

गोयल पुढे म्हणाले, ''भारतीय प्रशिक्षकांना आता ५० हजार ते २ लाख रुपये प्रदान करण्यात येईल. महासंघातर्फे विदेशी प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते, पण गरज भासली, तर आम्ही त्यासाठी जाहिरातही प्रकाशित करु. '' (वृत्तसंस्था)



विजेतेपद पटकावणारा संघ. सोबत पोलिस अधीक्षक नवीनचंद्र रेड्डी, कविता राऊत, प्रभारी पोलिस आयुक्त रितेश कुमार, विशेष पोलिस निरीक्षक अजित पाटील.

## औरंगाबाद शहर पोलीसला सर्वसाधारण विजेतेपद

### परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा : ग्रामीणला उपविजेतेपद

**औरंगाबाद :** गोकुळ मैदानावर गुरुवारी झालेल्या पोलिसांच्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत औरंगाबाद शहर पोलीस संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. यजमान ग्रामीण पोलीस संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. उस्मानाबादचा संघ तृतीयस्थानी राहिला. या स्पर्धेत बीडची ललिता साळवे आणि औरंगाबाद शहर पोलीसचा सलमान पठाण हे सर्वोत्तम खेळाडूचे मानकरी ठरले. हँडबॉल स्पर्धेत औरंगाबाद ग्रामीणने पुरुष गटात विजेतेपद पटकावले. महिलांच्या खो-खो स्पर्धेत औरंगाबाद ग्रामीण पोलीस संघाने अजिंक्यपद पटकावले.

बक्षीस वितरण आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, प्रभारी पोलीस आयुक्त रितेश कुमार, विशेष पोलीस निरीक्षक अजित पाटील, पोलीस अधीक्षक नवीनचंद्र रेड्डी, ज्योतीप्रिया सिंग, अनिल पारसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

## लोकमत औरंगाबाद मॅरेथॉन नोंदणीस प्रतिसाद

**औरंगाबाद : लोकमत** समूहातर्फे ११ डिसेंबर रोजी आयोजित लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनला जबरदस्त उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. वैयक्तिक आणि सामूहिक नोंदणी मोठ्या प्रमाणात होत आहे. गुरुवारी तळवलकर्स जीमच्या बऱ्याच सदस्यांनीदेखील उत्स्फूर्तपणे लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनमध्ये आपला सहभाग निश्चित केला आहे. याआधी ग्लेनमार्क कंपनीच्या कर्मचाऱ्यांनीदेखील उत्स्फूर्तपणे समूह नोंदणी केली होती.

'माझं पॅशन हीच माझी खरी ओळख', 'माझ्या प्रगतिपथाचा हाच तो प्रेरणास्रोत' आणि 'खरा विजय तोच, जेव्हा पॅशनला चालना मिळते' हे घोषवाक्य असणारी ही मॅरेथॉन ३ कि.मी., ५ कि.मी., १० कि.मी. आणि २१ कि.मी. अशा चार प्रकारांत आयोजित करण्यात आली आहे. यात फॅमिली रन ही ३ कि.मी. अंतरासाठी असणार आहे. यात आई, वडील आणि दोन मुले (१२ वर्षांखालील) यासाठी एक हजार रुपये नोंदणी शुल्क असणार आहे. फन रन ही ५ कि.मी. अंतरासाठी असणार आहे. याचे नोंदणी शुल्क ५00 रुपये असून, पॉवर रन १० कि.मी.साठी असून त्यासाठी ८00 रुपये शुल्क असणार आहे. अर्धमॅरेथॉन २१ कि.मी. अंतराची असणार आहे. त्यासाठी १,000 रुपये शुल्क असणार आहे.




सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना फॅमिली रनसाठी फक्त गुडबॅग, प्रमाणपत्र तर इतर गटातील स्पर्धकांना टी-शर्ट, गुडीबॅक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी सेलिब्रिटीदेखील या मॅरेथॉनमध्ये धावणार आहेत.

गारखेड्यातील विभागीय क्रीडा संकुलापासून सकाळी ५ वाजता मॅरेथॉनला सुरुवात होणार आहे. या मॅरेथॉनची सुरुवात विभागीय क्रीडा संकुलावर होणार असून, शहरातील विविध मार्गांवरुन निघणाऱ्यांचा समारोपही विभागीय क्रीडा संकुलावरच होणार आहे.



लोकमत समूहातर्फे आयोजित औरंगाबाद मॅरेथॉनमध्ये आपला प्रवेश निश्चित करणारे तळवलकर्स जीमचे सदस्य.

नावनोंदणीसाठी www. mycitymarathon.com या वेबसाईटवर ऑनलाईन प्रवेशिका भरण्याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड येथेही उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी ०२४०-६६०४५०२ आणि ८८५६८००३०१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## कन्नडला आजपासून राज्य कबड्डी स्पर्धा

**औरंगाबाद :** राज्य कबड्डी संघटना व जिल्हा कबड्डी संघटनेतर्फे मा. आ. किशोर पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त उद्यापासून कन्नड येथे राज्यस्तरीय कुमार, कुमारी कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत राज्यभरातून मुलींचे २५ आणि मुलांचे २५ असे एकूण ५0 संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी राज्यभरातून ५0 पंचांचादेखील सहभाग असणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मा. आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी आ. अतुल सावे व आ. हर्षवर्धन जाधव उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेचा समारोप आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी आ. अब्दुल सत्तार असणार आहेत. याप्रसंगी आ. सुभाष झांबड, आ. प्रशांत बंब उपस्थित राहणार आहेत. या कबड्डी स्पर्धेत क्रीडाप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन औरंगाबाद जिल्हा कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष दत्ता पाथ्रीकर, सरकार्यवाह आस्वाद पाटील यांनी केले आहे.

उद्घाटन सोहळ्यास जिल्हा कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष विजय पाथ्रीकर, कार्यवाह बाबूराव अतकरे, मधू बक्षी, पुंडलिक शेजूळ, गणेश शेट्टी यांची उपस्थिती असणार आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रसन्ना पाटील, प्राचार्य डॉ. हिमत नरके, देवाडीकर, संतोष मतसागर, वामन चव्हाण, सिद्धार्थ पाटील परिश्रम घेत आहेत.

## अंधांच्या क्रिकेटला मिळाली आत्मविश्वासाची भक्कम 'भिंत'

**बंगळुरु : टीम** इंडियाची भक्कम भिंत म्हणून ओळखला जाणारा माजी दिग्गज क्रिकेटपटू राहुल द्रविड याची अंध टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड झाली आहे. पुढील वर्षी भारतात होणाऱ्या या स्पर्धेसाठी भारतीय अंध क्रिकेट संघटनेने (सीएबीआय) द्रविडची नियुक्ती केली.



आगामी ३१ जानेवारी ते १२ फेब्रुवारीदरम्यान रंगणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन भारतातील आठ शहरांमध्ये होईल. या स्पर्धेत भारतासह ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, नेपाळ, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि वेस्ट इंडीज या संघांचा सहभाग आहे. स्पर्धा साखळी व बाद फेरीच्या आधारे खेळविण्यात येईल. ''जी. के. महंतेश यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. माझ्यामते त्यांच्याकडून खूप काही शिकण्याची आवश्यकता आहे. त्यांची कामगिरी माझ्या कामगिरीपेक्षा खूप मोठी आहे. मी केवळ जनजागृती करु शकतो. मात्र, त्यांनी अंध क्रिकेटचा खूप विकास केला आहे,'' अशा शब्दांत द्रविडने सीएबीआयचे अध्यक्ष महंतेश यांचे कौतुक केले.

## कविताचे टार्गेट वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धा

### तरच ऑलिम्पिक पदकविजेते खेळाडू घडतील : बालपणापासूनच पुरवायला हव्यात सुविधा

**औरंगाबाद : महाराष्ट्राची** दिग्गज लांब पल्ल्याची धावपटू आणि ऑलिम्पियन कविता राऊत हिचे लक्ष्य आहे ते लंडन येथे २०१७ मध्ये होणारी वर्ल्डचॅम्पियनशिप स्पर्धा. ऑलिम्पिकसह राष्ट्रकुल आणि आशिया स्पर्धेत आपला ठसा उमटवणाऱ्या कविता राऊत औरंगाबाद येथे पोलिसांच्या क्रीडा स्पर्धेच्या समारोपासाठी आली होती.

या वेळी तिने पत्रकारांशी संवाद साधला. ऑलिम्पिकमध्ये देशाला अद्यापही पदकविजेती कामगिरी करता आली नसल्याची खंत तिने व्यक्त केली. याविषयी तिने बोलताना सांगितले, 'खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्यानंतरच अद्ययावत सुविधा आणि चांगले प्रशिक्षक मिळतात. ऑलिम्पिकमध्ये पदकविजेते खेळाडू घडण्यासाठी जिल्हापातळीपासून आणि लहान वयापासूनच खेळाडूंना चांगले प्रशिक्षक, मैदान अशा सुविधा मिळणे नितांत गरजेचे आहे. खेळाडूंसाठी निवासी प्रशिक्षण सुविधा मिळायला हवी, असे घडले तरच देशात पदक विजेते खेळाडू घडतील.'

लंडन येथे २०१७ मध्ये वर्ल्डचॅम्पियनशीप स्पर्धा होत आहे. आपण ऑलिम्पिकसह राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धेत खेळलो आहोत. वर्ल्डचॅम्पियनशीप स्पर्धेसाठी प्रथम पात्र होण्याचे आपले टार्गेट असल्याचे तिने सांगितले.

आपण ग्रामीण भागातून आलो आहोत. ग्रामीण भागातील खेळाडूंना स्पर्धेसाठी जाण्यासाठी पैसेही नसतात. ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन तारका पी.व्ही. सिंधू आणि महिला मल्ल साक्षी मलिक यांनीच देशासाठी पदकविजेती कामगिरी केली. त्यामुळे पालकांनीदेखील आपल्या मुलींना खेळासाठी प्रोत्साहन द्यायला हवे, असे तिने सांगितले. याप्रसंगी कविता राऊतने खेळात शिस्त, आहार आणि सातत्य महत्त्वपूर्ण असल्याचा संदेश खेळाडूंना दिला.



- रिओ ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कविता राऊत हिने २०१० साली झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत १० हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत कास्यपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला खेळाडू म्हणून बहुमान मिळवला होता.
- तसेच तिने २०१० मध्येच आशियाई क्रीडा स्पर्धेत १० हजार मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले होते. गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या प्रभावी कामगिरीत सातत्य राखणाऱ्या कविता राऊत हिने १० कि.मी. रोड रनिंग रेसमध्ये ३४.३२ अशी वेळ नोंदवताना राष्ट्रीय विक्रम केला होता.
- कविता राऊत प्रतिष्ठित अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित आहे.

### कविता राऊतने जाहीर केली नाराजी

- मुख्यमंत्र्यांनी ऑलिम्पियन खेळाडूंना 'क्लास वन' पदावर सेवेत घेण्याची घोषणा केल्यानंतरही शासनाने वर्ग तीन पदावर आदिवासी विभागात नोकरी देण्याच्या प्रस्तावावर कविता राऊतने गुरुवारी आपली जाहीर नाराजी व्यक्त केली. 'क्लास वन'च्या पोस्टची इच्छा तिने व्यक्त केली आणि याविषयी क्रीडामंत्री विनोद तावडे यांच्याशी चर्चा झाली असून, त्यांनी योग्य तो निर्णय घेऊ, असे आश्वासन दिल्याचे कविता राऊतने सांगितले. आपल्याला निर्णयाची प्रतीक्षा असल्याची ती म्हणाली.

## राज्य शालेय हॉकी स्पर्धा आजपासून

**औरंगाबाद :** विभागीय क्रीडा संकुल येथे राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धा ११ नोव्हेंबरपासून होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ११ वाजता मनपा आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, क्रीडा उपसंचालक राजकुमार महादावाड, हॉकी महाराष्ट्रचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## कुस्ती : निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**औरंगाबाद :** ग्रामीण विभाग जिल्हा राष्ट्रीय तालीम मंडळातर्फे फुलंब्रीला वळण पिंपळगाव येथे निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मल्लांची वजने होतील आणि १३ रोजी स्पर्धेस सुरुवात होईल. या स्पर्धेतून राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी कुस्ती संघ निवडला जाणार आहे. या निवड चाचणीत जास्तीत जास्त मल्लांनी सहभाग निश्चित करावा, असे आवाहन तालीम मंडळाचे कार्याध्यक्ष दत्ता पाथ्रीकर, अध्यक्ष हरिसिंग राजपूत, सचिव प्रा. एन.जी. शिरसाठ, पर्वत कासुरे, शेखर शिरसाठ यांनी केले आहे.